IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मूल्यशिक्षणाची गरज.

- **संशोधक - डॉ. बाळू दत्तात्रय राठोड**

## १. सारांश

शिक्षण ही समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक अशी प्रक्रिया आहे. केवळ ज्ञान आणि कौशल्ये शिकवणे पुरेसे नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, सद्गुण, सामाजिक जबाबदारी आणि जीवनमूल्ये रुजवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भारताचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) हे शिक्षणव्यवस्थेतील सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश यावर भर देते, तसेच मूल्यशिक्षणालाही महत्त्व देते. NEP २०२० च्या केंद्रस्थानी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचे दृढ स्वप्न आहे. या धोरणाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट २०३० पर्यंत शालेय शिक्षणात १००% एकूण नोंदणी प्रमाण (GER) साध्य करणे आहे, ज्यामध्ये प्रीस्कूल ते माध्यमिक स्तरापर्यंत संपूर्ण घटक समाविष्ट आहे. हे धोरण खऱ्या अर्थाने भारतातील प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावे, कुणीही शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी दिशा देण्याचे महत्वपूर्ण कार्य करते. समावेशकता, लवचिकता, नवोन्मेष आणि विद्यार्थ्यांच्या समग्र विकासावर लक्ष केंद्रित करून, हे धोरण अशा शिक्षण प्रणालीची कल्पना करते जी व्यक्तींना वेगाने बदलणाऱ्या जगात भरभराटीसाठी कौशल्ये आणि ज्ञानाने सुसज्ज करते. अनुभव आधारित शिक्षणाकडे जाण्यास प्रेरित करते सोबतच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे केवळ ज्ञानी नसून जिज्ञासू, जुळवून घेणारे आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक नागरिक असलेल्या विद्यार्थ्यांच्या पिढीचे संगोपन करण्यासाठी सामूहिक दृष्टिकोण देण्याचे कार्य करते.

आज शिक्षणाचा विचार करतांना दिसते की, विज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे असंख्य साधने तरुणाईच्या हातात आली आहे. ही आधुनिक तंत्रज्ञानाची साधने व्यक्तीच्या सुलभतेसाठी वापरण्यात गैर काही नाही, पण, याच सांधनांचा वापर करून देशविघातक कृत्ये घडवून आणली जात आहे हे खऱ्या अर्थाने हानिकारक आहे. याचा विवेकपूर्ण विचार करून शिक्षणाच्या माध्यमातून यात आमूलाग्र बदल घडविण्याची खरी गरज आज आहे आणि ही गरज 'मूल्यशिक्षण' पूर्ण करू शकते. ही

मानवी जीवनाची घसरलेली गाडी पुन्हा रुळावर आणायची असेल शिक्षणाशिवाय पर्याय नाही...यासाठी शिक्षणात 'मूल्यशिक्षण' गरजेचे आहे असे मला वाटते.

२. **महत्त्वाचे शब्द ( Key words)** – शिक्षण, मूल्यशिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षण क्षेत्र, भारतीय ज्ञान आणि परंपरा

३. प्रस्तावना

शिक्षण म्हणजे काय ? शिक्षण कोणासाठी ? शिक्षणाने काय साध्य होईल ? असे अनेक प्रश्न आज प्रत्यक्षात दिसतात. या विविध प्रश्नांची उत्तरे देखील शिक्षणक्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या अनेकांकडे आहेत...पण, त्या उत्तराचा प्रत्यक्ष शिक्षण देतांना व्यक्तीच्या विकासाकरिता फायदा होतोय का हा खरा प्रश्न आहे. शिक्षणक्षेत्रातील महत्वाचे घटक म्हणजे अध्ययन आणि अध्यापन...अध्ययन आणि अध्यापन यास जोडणारा दुवा म्हणजे अभ्यासक्रम. अभ्यासक्रमामुळेच अध्ययन आणि अध्यापणास महत्व येते, शिक्षणाचा दर्जा अभ्यासक्रमामुळेच ठरतो त्यामुळे अभ्यासक्रम तयार करणाऱ्या मंडळींची जबाबदारी निश्चितच मोठी आणि महत्वाची आहे. अभ्यासक्रम तयार करतांना शिक्षणाच्या सध्यस्थितीची जाणीव आणि गरज काय आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. व्यक्तीचा सर्वांगीण विकास करण्याचे काम शिक्षण करते त्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करणारे अभ्यासक्रम हवेत. यात क्लासरुम शिक्षणासोबतच अनुभवावर आधारित शिक्षणही गरजेचं आहे. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी बहाल करण्यापुरता मर्यादित नसून शिक्षणातून आवश्यक कौशल्य प्राप्त करून स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी शिक्षण आहे ही भावना महत्वाची आहे.

भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये मंजूर केलेले आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्वाचे मुलतत्व म्हणजे भारतीय ज्ञान आणि परंपरेविषयी जागृत करणे, याविषयी येणाऱ्या पिढीला शिक्षित करणे. हा आपला देश आहे, आपली ज्ञान परंपरा आहे, देशातील विविध भागात असे बरेच ज्ञान आहे, असे बरेच लोकं आहेत ज्यांच्याविषयी आपल्याला नक्कीच अभिमान वाटेल. या भारतीय ज्ञान आणि परंपरेविषयी सोबतच भारतातील विविधांगी माहिती जी शिक्षणाच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचेल यासाठी येणाऱ्या पिढीला असे शिक्षण उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. हे तर आपले एक सौभाग्य आहे येणाऱ्या पिढीचा आणि आमच्या मुलांचा विचार करून या विषयावर खूप गंभीरपणे आपल्या विद्वानांनी, शिक्षणतज्ञांनी विचार केला आणि पूर्ण शिक्षण प्रणाली बदलण्यासाठी, विकसित करण्यासाठी एक पाउल उचलले..यासाठी अनेकानेक प्रयत्न केले. भारतीय ज्ञान परंपरेमध्येच मूल्याशिक्षणाची बीजे रोवली गेली आहे. भारतीय संस्कृती खऱ्या अर्थाने मूल्यांची शिक्षण देणारी

संस्कृती आहे असे म्हटले तर अतिशयोक्तीचे ठरणार नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान आणि परंपरेला महत्वाचे स्थान दिले असल्यामुळे मूल्याशिक्षणाला देखील स्थान मिळाले आहे. आजच्या बदलत्या आधुनिक काळात मूल्याशिक्षण देण्याची आवश्यकता अनेक शिक्षणतज्ञांनी अधोरेखित केलेली आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ उपजीविका मिळवण्यापलीकडे आहे. आपल्या विद्यार्थ्यांना समाजात राहण्याचे योग्य मार्ग शिकण्याची आवश्यकता आहे. आणि त्यांना प्रबुद्ध नागरिक बनवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे औपचारिक शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यापासूनच मूल्यांचे शिक्षण देणे. जागतिक जगाच्या स्वरूपासह, आपला समाज जागतिक गावाच्या एका भागात रूपांतरित झाला आहे. याचा अर्थ असा की आपल्या विद्यार्थ्यांना विविध वातावरण असलेल्या जगात राहण्याची आवश्यकता आहे. तरीही, त्यांना जागतिक स्तरावरील आव्हानांना तोंड द्यावे लागेल. मूल्य शिक्षणाची कल्पना म्हणजे समाजाची काळजी घेण्यास सक्षम असलेल्या प्रबुद्ध व्यक्तींचे संगोपन करणे.

## **४. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 चे स्वरूप**

### ४.१. **NEP 2020 चे उद्दीष्टे:**

NEP 2020 हे भारताच्या शिक्षण क्षेत्रात व्यापक सुधारणा घडविणारे धोरण आहे. याचे प्रमुख उद्दीष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

- विद्यार्थ्यांचा समग्र विकास – केवळ परीक्षानिश्चित अभ्यासक्रम न शिकवता जीवनकौशल्ये, नैतिकता, आणि सृजनात्मकता वाढवणे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा उद्धेश आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर आधारित ही अनुभव आधारित शिक्षण पद्धती आमुलाग्र बदल घडवून आनेल.
- ५+३+३+४ शिक्षण प्रणाली – पारंपरिक १०+२ प्रणालीऐवजी अधिक लवचिक आणि मूलगामी प्रणाली म्हणून आवश्यक आहे. यामुळे 3-6 वर्ष हा आतापर्यंत समाविष्ट न झालेला वयोगट शालेय अभ्यासक्रमा अंतर्गत येईल, जगभरात हा वयोगट, बालकाच्या मानसिक जडणघडणीच्या विकासा साठी अतिशय महत्वाचा मानला जातो. नव्या पद्धतीत तीन वर्षे अंगणवाडी/ शाळापूर्व वर्गांसह 12 वर्ष शाळा राहणार आहे.
- मातृभाषेत शिक्षण – विद्यार्थ्यांना समजण्यासाठी सोपी भाषा वापरणे ही काळाची गरज आहे. या धोरणामध्ये किमान इयत्ता 5 वी पर्यंत आणि प्राधान्याने 8 वी आणि त्यानंतरही मातृभाषा / स्थानिक भाषा / प्रादेशिक भाषा हे शिकवण्याचे माध्यम असावे यावर भर देण्यात आला आहे.

शालेय आणि उच्च शिक्षणाच्या सर्व स्तरांवर विद्यार्थ्यांना तीन-भाषांच्या सूत्रासह संस्कृतचाही एक पर्याय दिला आहे. भारतातील इतर अभिजात भाषा आणि साहित्य देखील पर्याय म्हणून उपलब्ध असतील. 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत इयत्ता ६-८ साठी 'भारताच्या भाषा' विषयावरील मजेदार प्रकल्प / उपक्रमात विद्यार्थी सहभागी होतील. माध्यमिक स्तरावर विविध परदेशी भाषांचा पर्याय देखील दिला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता वापरण्यासाठी भारतीय सांकेतिक भाषा (आयएसएल) संपूर्ण देशभरात प्रमाणित केली जाईल आणि राष्ट्रीय आणि राज्य अभ्यासक्रम सामुग्री विकसित केली जाईल. कुठल्याही विद्यार्थ्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही.

- सर्वसमावेशक शिक्षण – ग्रामीण भागातील, वंचित घटकांतील मुलांसाठी संधी निर्माण करणे हे देखील महत्वाचे अंग आहे.
- तंत्रज्ञान व डिजिटल शिक्षणाचा समावेश – ऑनलाइन शिक्षणाचे महत्त्व वाढवणे सोबतच आर्टिफिशियल इंटेलिजन्स वर आधारित शिक्षणाचाही समावेश यात असणार आहे.

४.२. शिक्षणातील मूल्यशिक्षणाचा समावेश

NEP 2020 मध्ये मूल्यशिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे.या धोरणानुसार, शालेय व महाविद्यालयीन स्तरावर नैतिकता आणि जबाबदारी यांचे शिक्षण देण्यात यावे, जेणेकरून विद्यार्थी समाजभान आणि आत्मभान युक्त होतील.

## ५. मूल्यशिक्षणाची संकल्पना आणि गरज

### ५.१. मूल्यशिक्षण म्हणजे काय?

मूल्यशिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांच्या वर्तन, दृष्टिकोन आणि निर्णयक्षमता विकसित करणारी प्रक्रिया. यामध्ये नैतिकता, जबाबदारी, सहकार्य, सहानुभूती, स्वावलंबन आणि नागरिकशास्त्र यांचा समावेश होतो. पूर्णपणे भारतीय संदर्भात, शिक्षणातील मूल्यांचा अर्थ एखाद्या व्यक्तीच्या नैतिक विकासाशी संबंधित आहे. आपले अलीकडील शैक्षणिक धोरण (NEP 2020), ते स्वतःशी आणि इतरांशी सुसंगत राहण्यासाठी आवश्यक असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये, कौशल्ये आणि दृष्टिकोन बिंबवणे अशी व्याख्या करते. २०२१ मध्ये, भारत सरकारने एक प्रेस अहवाल प्रसिद्ध केला ज्यामध्ये मूल्य शिक्षणाचा अभ्यासक्रमात समावेश (राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत) करण्यात आला आहे. या पायरीचा उद्देश भारतीय विद्यार्थ्यांमध्ये नैतिक तर्क विकसित करणे आणि पारंपारिक भारतीय मूल्ये (मानवी आणि संवैधानिक मूल्यांसह) रुजवणे आहे. सरकार आधीच विविध कार्यक्रमांद्वारे आपली भूमिका बजावत

असताना, आपल्या पारंपारिक/ऑनलाइन शाळांनीही त्यांची भूमिका चांगली बजावली पाहिजे असे अभिप्रेत आहे.

### ५.२. मूल्यशिक्षणाची गरज का?

कौशल्य-आधारित शिक्षण आणि सर्जनशीलतेच्या या आधुनिक युगात, मूल्य शिक्षणाकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाऊ शकते. तथापि, आपल्या जागतिकीकृत जगाच्या वाढत्या गुंतागुंतीसह, शिक्षणाचा हा पैलू आपल्या तरुणांसाठी आणि सर्वसाधारणपणे समाजासाठी एकमेव तारणहार आहे. दुर्दैवाने, आपले तरुण त्यांच्या जीवनाच्या उद्देशाचा मागोवा गमावत आहेत. आणि सर्वात वाईट गोष्ट म्हणजे ते त्यांच्या नैतिक मूल्यांवर (किंवा जीवन मूल्यांवर) पकड देखील गमावत आहेत. आपल्यापैकी अनेकांसाठी, गुन्हेगारी कारवायांमध्ये आपल्या तरुणांचा सहभाग खूपच चिंताजनक आहे. तथापी, आपल्यापैकी बरेच जण या परिस्थितींकडे दुर्लक्ष करणे निवडतात आणि या अप्रिय बाबींकडे जाण्याचा प्रयत्न करतात! त्यामुळे खऱ्या अर्थाने आजच्या काळात मूल्याशिक्षणाची खरी गरज आहे.

मूल्याशिक्षणाची खरी गरज का आहे यासाठी काही बाबी महत्वाच्या आहेत त्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

**मूल्याशिक्षणाची गरज प्रकर्षाने जाणवणारे काही तथ्य :-**

- २०२१ मध्ये, भारतीय दंड न्यायालय (भारताचा मुख्य गुन्हेगारी संहिता) अंतर्गत ३२,६५४ अल्पवयीन मुलांना अटक करण्यात आली.
- त्याचप्रमाणे, त्यापैकी ४७९० जणांना 'विशेष स्थानिक कायद्यां'अंतर्गत अटक करण्यात आली.
- यातील बहुतेक गुन्हे (७६.२% म्हणजे ३७,४४४ पैकी २८,५३९) १६ ते १८ वर्षे वयोगटातील अल्पवयीन मुलांनी केले होते.

**माहितीचा संदर्भ** - भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या **वार्षिक अहवाल २०२२-२३' अंतर्गत मुद्दा ४.३.**

**सोबतच काही बाबी :-**

1. नैतिकता आणि सद्गुणांचा अभाव : आजच्या तांत्रिक प्रगतीमुळे नैतिकतेकडे दुर्लक्ष होत आहे.

2. सामाजिक समस्या : भ्रष्टाचार, हिंसा, अन्याय आणि असमानता दूर करण्यासाठी मूल्यशिक्षण आवश्यक आहे.

3. करिअर आणि वैयक्तिक आयुष्य : जीवनात निर्णय घेण्यासाठी मूल्यशिक्षण मार्गदर्शक ठरते.

4. शाश्वत विकास : पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकी वाढवण्यासाठी मूल्यशिक्षण महत्त्वाचे आहे.

**६. NEP 2020 मध्ये मूल्यशिक्षणाचा समावेश**

NEP 2020 नुसार, मूल्यशिक्षणाचे शिक्षणव्यवस्थेत पुढीलप्रमाणे समावेश केला गेला आहे:

| स्तर | मूल्यशिक्षणाचे स्वरूप |
|---|---|
| प्राथमिक शिक्षण (५-८ वर्षे) | नैतिक कथा, बोधकथा, योग आणि ध्यानधारणा |
| माध्यमिक शिक्षण (९-१२ वर्षे) | समाजसेवा, नेतृत्वगुण, लोकशाही मूल्ये |
| उच्च शिक्षण (कॉलेज स्तर) | व्यावसायिक नीतिशास्त्र, जबाबदारीची जाणीव |

**७. शिक्षणव्यवस्थेतील मूल्यशिक्षणाचे फायदे**

७.१. विद्यार्थ्यांसाठी फायदे :

- निर्णयक्षमतेत वाढ

- समाज आणि पर्यावरणप्रती जबाबदारी

- आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण

७.२ समाजासाठी फायदे :

- सामाजिक सलोखा आणि शांतता

- भ्रष्टाचार आणि अन्याय कमी होणे

- जबाबदार नागरिकांची निर्मिती

८. **मूल्यशिक्षण अंमलबजावणीतील आव्हाने आणि उपाय**

८.१ आव्हाने :

१. परंपरागत शिक्षणावर अधिक भर : परीक्षा आणि गुणांवर जास्त लक्ष दिले जाते.

२. शिक्षक प्रशिक्षणाचा अभाव : मूल्यशिक्षण प्रभावीपणे शिकवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण गरजेचे आहे.

३. डिजिटल माध्यमांचा प्रभाव : इंटरनेटमुळे चुकीच्या माहितीचा प्रसार होऊ शकतो.

८.२. उपाय :

१. मूल्यशिक्षण अभ्यासक्रमात सक्तीचे करणे.

२. शिक्षकांसाठी नैतिक आणि मूल्याधारित शिक्षण देण्याची सोय करणे.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मूल्यशिक्षण संकल्पना अंमलात आणण्यासाठी शाळा आणि महाविद्यालये यांच्यात सहकार्य वाढवणे.

४. नवीन काळातील अभ्यासक्रमात खेळ, संगीत, लहान गटातील क्रियाकलाप इत्यादींद्वारे मूल्यशिक्षणाचा समावेश करण्याच्या प्रचंड शक्यता आहेत. हे सर्व विद्यार्थ्यांना दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करतात. याव्यतिरिक्त, हे त्यांच्या सामाजिक कौशल्यांना चालना देण्याचा एक उत्तम मार्ग देखील आहे. अभ्यासक्रमाच्या एकात्मिकतेची गुरुकिल्ली म्हणजे ते वयानुसार ठेवणे आणि विद्यार्थ्यांना सर्वोत्तम संधी देऊन पाठिंबा देणे.

५. जेव्हा विद्यार्थ्यांना इतर संस्कृतींचा शोध घेण्याची संधी मिळते तेव्हा त्यांच्यात आंतरसांस्कृतिक समज विकसित होते. हे सर्व मूल्ये रुजवण्यास मदत करते. एकंदरीत, या संधी वास्तविक जीवनातील अनुभव समृद्ध करून शिक्षण आणि मूल्यांना प्रोत्साहन देतात.

६. प्राचीन काळापासून (विसाव्या शतकापासून) आधुनिक शैक्षणिक सिद्धांतांपर्यंत, शिक्षणातील मूल्यांचा अर्थ एखाद्याच्या समग्र विकासाशी संबंधित आहे, याचा अर्थ असा की शिक्षण केवळ तेव्हाच समग्र आणि फलदायी) असू शकते जेव्हा ते एखाद्या व्यक्तीला समाजात संपन्न बनवते, म्हणूनच, मूल्य शिक्षण हा एक आधारस्तंभ आहे जो व्यक्तीच्या नैतिक विकासात मदत करतो.

## ९. निष्कर्ष/ निरीक्षणे :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे शिक्षणव्यवस्थेत अमूलाग्र बदल घडवून आणणारे आहे. केवळ शिक्षण आणि कौशल्यावर भर न देता, मूल्यशिक्षणालाही प्राधान्य दिले गेले आहे. आजच्या सामाजिक आणि तांत्रिक बदलांच्या पार्श्वभूमीवर, मूल्यशिक्षण अधिक गरजेचे बनले आहे. त्यामुळे NEP २०२०

प्रभावीपणे राबवले गेले, तर नैतिक, जबाबदार आणि कर्तव्यदक्ष नागरिक घडतील, जे देशाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण आणि मूल्ये दोन्ही आवश्यक आहेत. सध्याच्या काळात, विद्यार्थ्यांसाठी नैतिक मूल्ये शैक्षणिक यशाइतकीच महत्त्वाची आहेत. आज, आपल्या समाजाला शिक्षण आणि मूल्ये समान प्रमाणात असलेल्या व्यक्तींची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांसाठी नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात पूर्णपणे भरभराटीस सक्षम असलेले जबाबदार नागरिक म्हणून वाढण्यास आणि विकसित करण्यास मदत करतात. शिक्षण आणि मूल्ये विद्यार्थ्यांना त्यांच्यातील जन्मजात शक्ती आणि समाजात शांततेने जगण्याचे मार्ग शोधण्यास मदत करतात, अखेर, ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पाठिंबा देते. शिक्षणक्षेत्र आज विविध बदलातून जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020 मुळे अनेक प्रकारचे परिवर्तन होतांना आपल्याला दिसताय, या परिवर्तनाचे सकारात्मक परिणाम व्यक्तींवर तथा समाजावर होऊन समाज नितीवाण होईल यासाठी शिक्षणात मूल्याशिक्षण काळाची गरज आहे.

संदर्भ :

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 – भारत सरकार
२. शिक्षणशास्त्र आणि मूल्यशिक्षण – डॉ. रामदास जाधव
३. भारतीय संविधानातील नैतिक मूल्ये – डॉ. सुनील गुप्ता
४. Report on- K8School.com-importance-of-value-education

International Research Journal
IJNRD
Research Through Innovation